नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १७७ Issue - 177 | वार रविवार दि. १६ नोव्हेंबर २०२५ Blow- Sunday Date 16 November 2025 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com

# नौगाम पोलीस स्टेशन हादरलं, दिल्लीपेक्षाही मोठा स्फोट; ९ जणांचा मृत्यू

## फरिदाबादमधून जप्त स्फोटकं पेटल्याने दुर्घटना; अनेक पोलिस जखमी, परिसरात उडाली खळबळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

श्रीनगर : जम्मू काश्मीरमधील श्रीनगर येथील नौगाम पोलीस स्टेशनमध्ये शुक्रवारी रात्री भीषण स्फोट झाला. यामध्ये सात जणांचा मृत्यू झाला असून ३० जण जखमी झाले आहेत. जप्त केलेली स्फोटकं हाताळताना पोलीस स्टेशनमध्ये हा अपघात घडल्याचे प्राथमिक वृत्त आहे. या घटनेची चौकशी सुरु असून दहशतवादी हल्ल्याची शक्यताही वर्तवली जात आहे.

दक्षिण श्रीनगरमधील नौगाम पोलीस स्टेशनमध्ये शुक्रवारी रात्री उशिरा एक शक्तिशाली स्फोट झाला. या स्फोटात किमान सात जणांचा मृत्यू झाला असून ३० जण जखमी झाले आहेत. मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता अधिकाऱ्यांनी वर्तवली आहे.

प्रत्यक्षदर्शी आणि परिसरातील सीसीटीव्ही फुटेजमध्ये स्फोटामुळे इमारत हादरल्याचे आणि आगीचे लोळ आणि दाट धूर हवेत पसरल्याचे दिसून आले. अग्निशमन दल, रुग्णवाहिका आणि वरिष्ठ पोलीस अधिकारी घटनास्थळी तातडीने दाखल झाले. जखमींपैकी अनेक जण गंभीर अवस्थेत आहेत. ढिगाऱ्याखाली अडकलेल्यांचा शोध बचाव पथकांकडून सुरू आहे.



स्फोटाची तीव्रता इतकी होती की मृतदेहाचे तुकडे घटनास्थळापासून ३०० फूट दूरपर्यंत सापडले. स्फोटाची दोन संभाव्य कारणे तपासली जात आहेत. एक म्हणजे, मॅजिस्ट्रेटच्या उपस्थितीत अमोनियम नायट्रेट सील करताना ते पेटले असावे. दुसरे कारण म्हणजे दहशतवादी हल्ला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फरीदाबादमधून आणलेले स्फोटक पोलीस आणि फॉरेन्सिक टीम हाताळत असताना हा स्फोट झाला. दहशतवादी मॉड्यूल प्रकरणात जप्त केलेल्या ३५० किलो स्फोटकांपैकी मोठा साठा या पोलीस स्टेशनमध्ये ठेवण्यात आला होता. काही जप्त केलेले रसायन पोलीस फॉरेन्सिक लॅबमध्ये पाठवण्यात आले होते, परंतु मोठा साठा स्टेशनमध्येच होता.

पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार, मृतदेह श्रीनगरमधील पोलीस कंट्रोल रूममध्ये नेण्यात आले आहेत. स्फोटाचे आणखी एक कारण म्हणून पोलीस स्टेशनच्या आवारात सापडलेली जप्त केलेली कार आयईडीने सज्ज होती का, याचाही तपास केला जात आहे. या कारमुळे मोठा स्फोट झाला असावा, अशी शक्यता आहे.

'झत्रऋ' या जैश-ए-मोहम्मदशी संबंधित संघटनेने स्फोटाची जबाबदारी स्वीकारल्याचा दावा केला आहे, मात्र अधिकारी या दाव्याची पडताळणी करत आहेत. सुरक्षा दलांनी स्निफर डॉग्सच्या मदतीने परिसर तपासला असून तो सील करण्यात आला आहे. श्रीनगरचे डेप्युटी कमिशनर अक्षय लबरू यांनी जखमींची रुग्णालयात भेट घेतली.

फरीदाबादमधील डॉ. मुज्जमिल शकील गनाई याच्या भाड्याच्या घरातून हे ३५० किलो स्फोटक जप्त करण्यात आले होते. डॉ. गनाई हा आतापर्यंत अटक झालेल्या आठ जणांपैकी एक आहे.

या आठवड्यात दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ झालेल्या कार बॉम्बस्फोटात १३ जणांचा मृत्यू झाला होता. या पार्श्वभूमीवर, जम्मू-काश्मीरचे डीजीपी नलीन प्रभात यांनी शुक्रवारी संध्याकाळी संपूर्ण केंद्रशासित प्रदेशात सुरक्षा आढावा घेतला होता. नौगाम स्फोटामुळे या दोन्ही घटनांमध्ये काही संबंध आहे का, याचा तपास आता अधिक वेगाने सुरू झाला आहे.

या दहशतवादी मॉड्यूलचा पर्दाफाश एका धमकीच्या पोस्टरमुळे झाला. ऑक्टोबरच्या मध्यावर नौगाममध्ये धमकीची पोस्टर्स आढळली होती. सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने पोलिसांनी तीन स्थानिक रहिवाशांना अटक केली. हे तिघेही यापूर्वी दगडफेकीच्या प्रकरणात सामील होते.

त्यांच्या चौकशीतून मौलवी इरफान अहमदची भूमिका समोर आली. हा माजी पॅरामेडिक असून त्याने अनेकांना कट्टरपंथी बनवले आणि पोस्टर्स पुरवले होते. या तपासातून फरीदाबादमधील अल-फलाह विद्यापीठापर्यंत पोहोचले, जिथे डॉक्टर मुज्जमिल गनाई आणि शाहीन सईद यांना अटक करण्यात आली.

संशयितांशी संबंधित भाड्याच्या खोल्यांमधून अमोनियम नायट्रेट, पोटॅशियम नायट्रेट, सल्फर आणि इतर स्फोटक साहित्य जप्त करण्यात आले. यासोबतच पुलवामा येथील आणखी एका डॉक्टरशी संबंधित २,९०० किलो रसायनही जप्त करण्यात आले.

या मॉड्यूलमध्ये तीन डॉक्टर सक्रिय होते, असे मानले जात आहे. डॉ. मुज्जमिल गनाई (अटक), उमर नबी (ज्याने १० नोव्हेंबर रोजी लाल किल्ल्याजवळ स्फोटकांनी भरलेली कार चालवली होती) आणि मुजफ्फर रॅदर (फरार). आठवा आरोपी आणि फरार डॉक्टरचा भाऊ आदिल रॅदर याला एके-५६ रायफलसह अटक करण्यात आली आहे. त्याची भूमिका तपासली जात आहे.

# सोलापूर जिल्ह्यात भाजपचा स्वबळाचा नारा! नगराध्यक्ष पदाचे सर्व उमेदवार कमळ चिन्हावरच लढणार : जयकुमार गोरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर झाल्यानंतर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. राजकीय नेत्यांनी गाठी भेटी दौरे सुरु केले आहेत. तसेच इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती देखील सुरु केल्या आहेत. दरम्यान, महायुती एकत्र लढणार की स्वतंत्र? याबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. दरम्या, अशातच सोलापूर जिल्ह्यात भाजप स्वबळावर लढणार असल्याचं आता स्पष्ट झालं आहे. कारण सर्व उमेदवार कमळ चिन्हावर निवडणूक लढवणार आहेत. सोलापूर जिल्ह्यातील सर्व ११ नगरपालिका आणि एक नगरपंचायत मधील नगराध्यक्ष पदाचे उमेदवार निश्चित झाले आहेत. भाजप सर्व ठिकाणी पक्षाच्या चिन्हावर निवडणूक लढवणार असल्याची माहिती खुद्द सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली आहे.

जयकुमार गोरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, १७ तारखेला सकाळी नगराध्यक्ष व सर्व नगरसेवकांची यादी जाहीर होणार आहे. नगराध्यक्ष पदाचे सर्व उमेदवार कमळ चिन्हावर निवडणूक लढणार असल्याचे गोरे म्हणाले. दरम्यान, आता भाजपच्या या निर्णयानंतर महायुतीमधील इतर मित्रपक्ष नेमकी काय भूमिका घेणार हे पाहणं देखील महत्वाचं ठरणार आहे. ४ नोव्हेंबरला राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकांची घोषणा करण्यात आली आहे. निवडणूक आयोगानं पत्रकार परिषद घेत मतदानाच्या तारखा जाहीर केल्या आहेत. त्यासाठी २ डिसेंबर रोजी मतदान होणार असून त्याचा निकाल ३ डिसेंबर रोजी होणार आहे. दरम्यान, या निवडणुकीसाठी ४ नोव्हेंबरपासून आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. राज्यातील २९ महापालिका, ३२ जिल्हा परिषदा, ४२ नगर पंचायती, ३३६ पंचायत समिती, २४६ नगरपालिकांची मुदत संपली असून त्यासाठी निवडणुका घेण्यात येणार आहे. त्याच्या पहिल्या टप्प्यात नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुका घेण्यात येणार आहेत. राज्यातील नगरपालिका आणि नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी अंतिम मतदार यादी ३१ ऑक्टोबरला प्रसिद्ध झाली आहे. त्यानुसार मतदान होणार आहे. त्यामध्ये एकूण १ कोटी ७ लाख ३ हजार ५७६ मतदार असतील.

## पूरग्रस्त शेतर्कयांसाठी फडणवीस सरकारची मोठी घोषणा!

# खरडलेल्या जमिनींसाठी मिळणार मोफत मातीसह गाळ अन् मुरूम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील पूरग्रस्त शेतर्कयांसाठी काहीशी दिलासादायक बातमी समोर आली आहे. राज्य सरकारने पूरग्रस्त शेतर्कयांसाठी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यात अतिवृष्टीमुळे बाधित शेतर्कयांच्या खरडलेल्या शेतजमिनीसाठी मोफत माती, गाळ, मुरूम आणि कंकर दिला जाणार असल्याची माहिती पुढे आली आहे. जमीनीच्या सुपीकतेसाठी महसूल मंत्र्यांनी हा मोठा निर्णय घेतलाय. पूरग्रस्त जमीनीसाठी गौण खनिजे इत्यांदींवर रॉयल्टी माफ करण्यात येणार आहे. दरम्यान, राज्य सरकारच्या या निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्याचे आदेश राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहे. त्यामुळे अतिवृष्टी बाधित पूरग्रस्त शेतर्कयांना या निर्णयामुळे दिलासा मिळाल्याचे चित्र आहे.

निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांना आदेश

शेतकऱ्यांना आपण जगाचा पोशिंदा, अन्नदाता म्हणतो. पण सध्या राज्यातील शेतकरी संकटात सापडलाय. अतिवृष्टी आणि पुरामुळं शेतकऱ्यांच्या घराचं, पिकांचं आणि त्याचबरोबर जमिनींचं मोठं नुकसान झालंय. सोलापूर जिल्ह्यातील सीना नदीला सप्टेंबर महिन्यात महापूर आला होता. या पुरात शेतकऱ्यांची पिकं तर वाहून गेलीच, पण जमिनी देखील वाहून गेल्या आहेत. जमिनीला १० ते १५ फुटाचे खड्डे पडलेत. नदीने पाण्याचा प्रवाहच बदलल्यानं सगळं होत्याचं नव्हतं झालं आहे. अशीच काहीशी परिस्थिती उर्वरित महाराष्ट्रातील बहुतांश ठिकाणी बघायला मिळाली आहे. दरम्यान, या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना



मायेचा आधार देण्यासाठी आता राज्य सरकारने हा महत्वाचा निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्रात ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे तब्बल ३० जिल्ह्यांमध्ये शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात आले आहेत. गेल्या दोन महिन्यांमध्ये राज्यात पावसाचे थैमान चालू असून, पुर आणि अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात राज्यातील १,७८५,७१४ हेक्टर (४,२८४,८४६ एकर) क्षेत्र अतिवृष्टीमुळे बाधित झाले आहे. या काळात प्रामुख्याने खरीप पिकांचे नुकसान झाले असून, सोयाबीन, मका, कापूस, उडीद, तूर, मूग यासोबतच भाजीपाला, फळपिके, बाजरी, ऊस, कांदा, ज्वारी व हळद यांनाही मोठा फटका बसला आहे.

सर्वाधिक नुकसान झालेले जिल्हे नांदेड (७२८,०४९ हेक्टर), यवतमाळ (३१८,८६० हेक्टर), वाशीम (२०३,०९८ हेक्टर), धाराशिव (१५७,६१० हेक्टर), अकोला (१७७,४६६ हेक्टर), सोलापूर (४७,२६६ हेक्टर) आणि बुलढाणा (८९,७८२ हेक्टर) आहेत.राज्यातील एकूण १९५ तालुक्यांमध्ये या अतिवृष्टीमुळे नुकसान झाले असून ६५४ महसूल मंडळांतील खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

## बिहारमधील दारुण पराभवानंतर राहुल गांधी थेट मल्लिकार्जुन खरगेंच्या घरी पोहोचले

# भाजपवर निवडणूक हेराफेरीचा आरोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : बिहार निवडणुकीत झालेल्या दारुण पराभवानंतर, काँग्रेस पक्षाने आज (१५ नोव्हेंबर) दिल्लीत पहिली आढावा बैठक घेतली. पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या निवासस्थानी ही बैठक झाली, ज्यामध्ये लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, केसी वेणुगोपाल आणि अजय माकन उपस्थित होते. यावेळी नेत्यांनी निवडणूक निकालांचा आढावा घेतला, संघटनात्मक त्रुटींवर चर्चा केली आणि भविष्यातील रणनीतीसाठी सूचना दिल्या. सूत्रांच्या माहितीनुसार, पक्ष आता बिहारमध्ये इतक्या मोठ्या पराभवामागील कारणे समजून घेण्याचा प्रयत्न करत आहे.




बैठकीनंतर काँग्रेस नेत्यांनी भाजपवर निवडणूक हेराफेरीचा आरोप केला. काँग्रेस नेते केसी वेणुगोपाल यांनी सांगितले की पक्ष अनियमिततेचे पुरावे गोळा करत आहे आणि ते दोन आठवड्यांत देशासमोर सादर करेल. काँग्रेसने या निवडणुकीत ६१ जागांवर उमेदवार उभे केले होते, परंतु त्यांना फक्त सहा जागांवर विजय मिळाला. पक्षाचा मतांचा वाटा ८.७१ टक्क्यांपर्यंत घसरला. २०२० मध्ये ७० जागांवर लढून १९ जागा मिळाल्या होत्या आणि त्यांना ९.६ टक्के मते मिळाली होती. अजय माकन म्हणाले, अनेक ठिकाणी अनियमितता होत्या. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्याशी भेट घेतल्यानंतर, पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी बिहार निवडणूक निकालांबद्दल गंभीर प्रश्न उपस्थित केले. अजय माकन असेही म्हणाले की, सुरुवातीपासूनच निवडणूक प्रक्रियेबद्दल प्रश्न उपस्थित झाले आहेत, त्यामुळे हे निकाल आश्चर्यकारक आहेत. १९८४ मध्येही काँग्रेसने यावेळी भाजपने मिळवलेला स्ट्राइक रेट गाठला नाही. काहीतरी चूक आहे. आमचे कार्यकर्ते अनेक ठिकाणी सतत अनियमितता नोंदवत आहेत. माकन म्हणाले की, सर्व आघाडी पक्ष या निकालाला अनपेक्षित मानतात आणि चौकशीची मागणी करत आहेत.

मुख्यमंत्र्यांच्या चेहऱ्यापासून ते जागावाटपापर्यंत, महाआघाडीची घसरण झाली. महाआघाडी ५० जागांपर्यंतही पोहोचू शकली नाही. हे मुख्यत्वे राजद आणि काँग्रेसच्या खराब कामगिरीमुळे आहे. राहुल आणि तेजस्वी यांनी मतदार हक्क यात्रेसोबत महाआघाडीला एकत्रितपणे सादर करण्याचा प्रयत्न केला, परंतु तेजस्वी यांना मुख्यमंत्री चेहरा म्हणून घोषित केल्याने त्यांच्यात फूट पडली. नंतर, काँग्रेसनेही तेजस्वी यांना मुख्यमंत्री चेहरा बनवण्यास सहमती दर्शविली, परंतु तोपर्यंत, राजद आणि काँग्रेसमध्ये मतभेद असल्याचा संदेश पसरला होता. प्रचारापासून ते तिकीट वाटपापर्यंत सर्व गोष्टींमध्ये हे दिसून आले.


पहिल्या टप्प्यातील निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत महाआघाडीत तणाव कायम होता. आरजेडी आणि काँग्रेस जागावाटपावर ठाम राहिले. यामुळे सर्व पक्षांचे उमेदवार अर्ज दाखल करत होते, परंतु कोणता पक्ष किती जागा लढवेल हे स्पष्ट नव्हते. शेवटी, आरजेडीने १४६ जागा, काँग्रेसने ५९, व्हीआयपीने १३, सीपीआय-एमएलने २०, सीपीआयने ७, सीपीएमने ४ आणि आयआयपीने २ जागा लढवल्या. महाआघाडीने २४१ जागांसाठी २५० उमेदवार उभे केले. पूर्व चंपारण्यमधील सुगौली आणि रोहतासमधील मोहनिया येथे महाआघाडीने अपक्षांना पाठिंबा दिला. मतदारसंघांवर एकमत न झाल्याने, महाआघाडीच्या पक्षांनी एकमेकांविरुद्ध उमेदवार उभे करण्यास सुरुवात केली आणि त्यांच्या मतदारांना गोंधळात टाकले. एकूण नऊ जागांवर हे घडले. त्या सर्व जागांवर दारुण पराभव स्वीकारावा लागला. यामध्ये एकच उमेदवार असता तर किमान या जागा तरी राखल्या असत्या अशी स्थिती निकालानंतर झाली.

जिल्हा परिषद व नगरपालिका निवडणूक




प्रचार साहित्य

अत्याधुनिक निवडणूक मोबाईल ॲप फक्त आमच्या कडेच वापरा व हमखास निवडून या.



मतदार स्लिप नांव व मतदान केंद्रासहीत फक्त आमच्याकडेच मिळतील.

प्रचार साहित्य
१. डमी वोटिंग मशिन
२. झेंडे, टोपी,पंचा ३. बिल्ले
४. मतदार स्लिप ५.स्टिकर ६.पॉम्प्लेटस
७. स्लिप प्रिंटर ८. सॉफ्टवेअर
९. बॅचेस १०. एस.एम.एस./व्हाईस कॉल

नितीन कन्सलटन्सी
नितीन हलसगी
मो. 9595427070 / 9270325070

# श्री रुक्मिणी पांडुरंग प्रसन्न आज आळंदी एकादशी जय हरी माऊली !

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आज १५ नोव्हेंबर कार्तिक वद्य एकादशी म्हणजे आळंदी एकादशी आहे.

या एकादशीला आळंदी एकादशी म्हणण्याचे कारण म्हणजे ज्ञानेश्वर माऊलींनी समाधी मध्ये लिन होण्याचे निश्चित केले होते. त्यामुळे सर्व भागवत भक्त वारकरी मंडळी यांनी एकच आळंदीकडे धाव घेतली होती. लाडक्या भक्ताचा निश्चय समजल्याने प्रत्यक्ष पांडुरंगाने देखील आळंदी कडे धाव घेतली होती. त्यामुळे कार्तिक वद्य एकादशीला म्हणजे आळंदी एकादशीला लाखो वारकरी भक्त आळंदी मध्ये दर्शनासाठी उपस्थित आजही असतात. त्यानंतर एक दिवसाचे अंतराने कार्तिक वद्य त्रयोदशीला ज्ञानेश्वर माऊली यांचा संजीवन समाधी सोहळा होत असतो. लाखो भागवत भक्तांच्या वारकऱ्यांच्या डोळ्यात अश्रूंचां महापुर असतो. माऊली शिवाय दुसरा शब्द कानावर पडत नाही. आज जर आपल्या मनाची इतकी उलघाल होत असेल तर प्रत्यक्ष माऊलींनी समाधी घेताना त्या वेळची परिस्थिती कशी असेल ? काय असेल लहान बंधू सोपान याच्या मनाची अवस्था ? काय असेल त्या मुक्ताईची मनाची अवस्था ?

निवृत्तीनाथ मात्र स्थितप्रज्ञ आणि गुरूच्या भूमिकेत असल्याने धीर गंभीर शांत होते. समाधी घेण्यासाठी माऊलींनी गुहेत प्रवेश केल्यावर निवृत्तीनाथ दादांनी हाताला धरून माऊलींना आसनावर बसविले, कोण होते त्यावेळी साक्षीला तर प्रत्यक्ष पांडुरंग च, अन्य कोणी नव्हते. बाहेर येऊन गुहेचा दरवाजा मोठ्या दगडी शिळेने बंद करताना मात्र मुक्ताईने हंबरडा फोडून एकच आर्त किंकाळी मारली होती. त्या वेळचाच अभंग म्हणजे ताटी उघडा ज्ञानेश्वरा हा होय. लाडक्या भक्ताने म्हणजे माऊलींनी समाधी घेतल्याने प्रत्यक्ष पांडुरंगाला देखील विरह सहन झाला नाही आणि त्यांनी पंढरी सोडली आणि भीमा नदीच्या तीरावर गोपाळपूर येथे विष्णू पदावर जाऊन मन शांत करण्याचा प्रयत्न म्हणून एक महिना वास्तव्य केले. म्हणून मार्गशीर्ष महिन्यात पांडुरंग पंढरपूर मध्ये नसून विष्णू पदावर वास्तव्यास असतो, म्हणून तिथे सर्व भक्त मंडळी दर्शनासाठी रांग लावतात. गोपाळपूरलाच बाल गोपाळांचा मेळा जमवून गुरे राखताना तिथेच भक्तासह घरच्या जेवणाचा अंगत पंगत करून गोपाळकाला करून देवाने प्रसाद ग्रहण केला होता, त्याची आठवण म्हणून आजही विष्णू पदावर घरचे डबे घेऊन जाऊन सामुदायिक एकत्र बसून प्रसाद घेण्याची परंपरा भक्ताकडून पाळली जाते. विष्णुपदावर नदी काठाला घाटावर पायऱ्या उतरताना संत सखुला जिथे सुळावर देण्याचा प्रयत्न झाला आणि त्या सुळा चे पाणी झाले अशी आख्यायिका आहे, ती जागा तिथे आहे. तर जवळच गोपाळपूरला संत जनाबाईचा संसार आहे. जनाबाईंनी पांडुरंगा बरोबर दळण दळलेले दगडी जाते आणि हांड्यामध्ये विरजण घुसळलेली रवी वगैरे दाखवली जाते.




विष्णू पदावर नदीपात्रामध्ये छोटेसे नारद मंदिर देखील आहे.

आळंदी म्हणजे इंद्रायणी काठी वसलेली अलंकापुरी होय.

ज्ञानेश्वर माऊली यांचा काळ १२ व्या शतकातला. तर संत एकनाथ महाराज यांचा काळ सतराव्या शतकातला. देवत्वाला पोहाचलेली आणि देवाशी संधान समक्ष बांधलेली अशी ही संत मंडळी. १२ व्या शतकात माऊलींनी समाधी घेतल्यानंतर गुहेच्या वरती असणाऱ्या अजान वृक्षाची मुळे गुहेमध्ये जाऊन माऊलींच्या शरीराला आणि गळ्याला गुंडाळल्यासारखी झाली होती, त्यामुळे माऊलींना त्रास होत होता, पण सांगणार कोणाला ? आणि समजणार कोणाला ? प्रत्येक प्राणीमात्रामध्ये आणि वनस्पतीमध्ये सुद्धा जीव असतो असे आपला धर्म सांगतो. साहजिकच अजानवृक्षाच्या मुळांना देखील माऊलींच्या आकर्षणाने मोह आवरला नसणार आहे. माऊलींनी संत एकनाथ महाराजांच्या कानावर ही गोष्ट आंतरज्ञानाने घातली असावी. त्यामुळे संत एकनाथ महाराज यांनी माऊलीच्या समाधी च्या गुहेवरील शिळा बाजूला करून त्या अजानवृक्षांच्या सर्व मुळांना बाजूला केले होते अशी देखील आख्यायिका आहे. असे ऐकले आहे. जाणकारांनी यावर प्रकाश टाकावा. आजही आळंदीला अजान वृक्षाच्या खाली शेकडो भक्त पारायण करण्यासाठी बसलेले असतात, पारायण करताना अजान वृक्षाचा पाला किंवा पान जरी अंगावर पडले तरी देखील धन्य समजले जाते किंवा पुण्यवान/भाग्यवान समजले जाते. देवा वरती ज्यांची आढळ श्रद्धा आहे त्यांना निश्चित प्रचिती येत असते.

ज्यांची श्रद्धा आहे त्यांनी माऊलीचे दर्शन घ्यावे. ज्यांची श्रद्धा नाही त्यांना आमचां अजिबात आग्रह नाही. त्यांनी तिकडे फिरकू देखील नये.

माऊलींना त्यांच्या २१ वर्षाच्या आयुष्यामध्ये खूप लोकांनी त्रास दिला, यातना सोसाव्या लागल्या. तरी देखील त्यांनी कोणालाही दोष दिला नाही. ज्ञानेश्वरी हा जगाच्या अंतापर्यंत मानव धर्माला मार्गदर्शन करेल असा ग्रंथ लिहून ठेवला आहे. ज्ञानेश्वरी ग्रंथ ज्या खांबाला टेकून माउलींनी लिहिला आहे त्या दगडी खांबाचे देखील नेवासा येथे मंदिर बांधले आहे.

जप तप साधना करणे हे जसे परमेश्वर प्राप्तीचे साधन आहे, तसेच सर्वसामान्य भक्तांच्या साठी वारकरी संप्रदायामध्ये ज्ञानोबा तुकाराम किंवा बोलीभाषेत ग्यानबा तुकाराम हा मंत्र म्हणजे देवापर्यंत जाण्यासाठीचा जवळचा मार्ग म्हणजे शॉर्टकट आहे असे समजण्यास हरकत नाही. देव हा भावाचा भुकेला आहे. नियत साफ ठेवा, भावना पवित्र ठेवा, म्हणजे प्रत्यक्ष पांडुरंग तुमच्याजवळ हजर आहे.

आळंदीला बऱ्याच वेळा जाऊन माऊलीचे समाधीचे दर्शन घेतले आहे, तसेच नेवासा येथील त्या पवित्र खांबाचे देखील दर्शन घेतले आहे.

आषाढी आणि कार्तिकी वारीसाठी पालख्या येत असतात. कोणालाही आमंत्रण नसते, सांगावे लागत नाही, तरी देखील आषाढी वारीसाठी माऊलीच्या पालखी बरोबर दरवर्षी लाखोच्या संख्येने वारकरी वाढतच आहेत.

जो जे वांच्छील तो ते लाहो प्राणीजात !

असे फक्त पसायदानामध्ये ज्ञानेश्वर माऊलीच देवाकडे सर्व प्राणीमात्रासाठी प्रार्थना करून मागणी मागू शकतात. असा हा आपला भागवत धर्म जगामध्ये श्रेष्ठ आहे.

ज्ञानेश्वरी मधील प्रत्येक ओवीला शास्त्र आधार आहे.

ज्ञानाचा सागर सखा माझा ज्ञानेश्वर

अशी संत मंडळी उगीच गोडवे गात नाहीत.

ज्ञानेश्वरी हा पवित्र ग्रंथ घरी आणून पारायण जरी जमले नाही तरी निदान रोज एक तरी ओवी वाचून पुण्यसंचय करावा, आयुष्याचे सार्थक होईल.

जय हरी माऊली !

**– अॅड. रमेश दिनानाथ जोशी, मंगळवेढा**

# लंडन मधील ऐतिहासिक ‘इंडिया हाऊस’ महाराष्ट्र शासन ताब्यात घेणार : सांस्कृतिक कार्य मंत्री अॅड. आशिष शेलार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भारतीय स्वातंत्र्यसैनिकांचे वास्तव्य असलेले लंडनमधील इंडिया हाऊस महाराष्ट्र शासन ताब्यात घेऊन त्यास स्मारक म्हणून जतन करेल. या ‘इंडिया हाऊस’मध्ये स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे वास्तव्य होते, अशी माहिती सांस्कृतिक कार्य मंत्री अॅड.आशिष शेलार यांनी दिली.

सांस्कृतिक कार्य मंत्री अॅड.शेलार हे नागपूरकरचे रघूजीराजे भोसले यांची ऐतिहासिक तलवार आणण्यासाठी लंडन दौऱ्यावर होते, तेव्हा त्यांनी इंडिया हाऊसला भेट दिली होती. त्यावेळी लंडनस्थित भारतीयांनी ही बाब त्यांच्या निदर्शनास आणून दिली होती. तसेच नाशिकच्या आमदार देवयानी फरांदे यांनीही ही मागणी केली होती. याबाबत आमदार देवयानी फरांदे, सामान्य प्रशासन, सांस्कृतिक कार्य, पुरातत्व विभागासह संबंधित विभागाचे अधिकारी यांच्या उपस्थितीत संयुक्त बैठक घेऊन आढावा घेण्यात आला. मित्राच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करून त्यात सामान्य प्रशासन विभाग, सांस्कृतिक कार्य विभाग, पुरातत्व विभाग आणि वित्त विभागाचा सहभाग असेल. ही समिती ‘इंडिया हाऊस’ ताब्यात घेण्याबाबतचा सर्वंकष अहवाल तयार करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सादर केल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली.







# वैनतेय इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये बालदिन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : वैनतेय इंग्लिश मीडियम स्कूल, निफाड येथे बालदिनानिमित्त आज आनंददायी टॅलेंट हंट कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सुप्त कलागुन सादर केले . तबला, पियानो, गायन, नृत्य, कविता वाचन, मिमिक्री इत्यादी विविध कलांची मनमोहक सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले तसेच नर्सरी, जूनियर, सीनियर या बाल गटातील विद्यार्थ्यांची वेशभूषा स्पर्धा घेण्यात आली. सदर स्पर्धेचे परीक्षक म्हणून भारती कापसे यांनी काम केले. विद्यार्थ्यानी आत्मविश्वासाने कार्यक्रमात सहभागी होउन कार्यक्रम अधिक रंगतदार केला. विद्यार्थ्यांच्या प्रभावी सादरीकरणाला उपस्थित पालक वर्ग व विद्यार्थ्यानी भरभरून दाद दिली तसेच संस्थेच्या सर्व विश्वस्तांनी व विद्यालयाच्या प्राचार्य यांनी कार्यक्रमात सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. व सर्व विद्यार्थ्यांना बालदिनाच्या शुभेच्छा दिल्या व असे उपक्रमांमुळे मुलांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो, असे सांगितले. शाळा व्यवस्थापन व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांचे कौतुक केले.

# नितीश कुमार हेच बिहारचे मुख्यमंत्री होणार? चिराग पासवान यांच्यासह एनडीएच्या बड्या नेत्यांनी दिले संकेत



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : २०२५ च्या बिहार विधानसभा निवडणुकीत एनडीएच्या प्रचंड विजयानंतर, मुख्यमंत्रिपदाच्या चर्चांना वेग आला आहे. दरम्यान, एचएएम (धर्मनिरपेक्ष) चे राष्ट्रीय अध्यक्ष संतोष कुमार सुमन यांनी एक महत्त्वपूर्ण वक्तव्य केलं आहे. आम्ही जनतेचे आभार मानतो; हा लोकशाहीचा विजय आहे. आम्ही नितीश कुमार यांचे अभिनंदन करण्यासाठी गेलो होतो. त्यांच्या नेतृत्वाखाली हा जनादेश मिळाला आहे, त्यामुळे ते निश्चितच मुख्यमंत्री होतील असं वक्तव्य संतोष कुमार यांनी केलं आहे.

या विजयाचे श्रेय जनतेला जाते. नितीश कुमार अभिनंदनास पात्र आहेत. त्यांनी पंतप्रधान आणि सर्व आघाडी नेत्यांचेही आभार मानले. संतोष सुमन यांनी असेही म्हटले की, सर्वांना माहिती आहे की नितीश कुमार यांच्यात बिहारचे नेतृत्व करण्याची क्षमता आहे. त्यामुळे ते निश्चितच मुख्यमंत्री होतील. या विधानावरून स्पष्ट होते की एचएएम (धर्मनिरपेक्ष) नितीश कुमार यांच्या मागे पूर्णपणे एकजूट आहे.

मुख्यमंत्री म्हणून नितीश कुमार यांच्या नियुक्तीबाबत चिराग पासवान म्हणाले की, ते मुख्यमंत्रिपदाची भूमिका पार पाडतील. त्यांनी महाआघाडीवरही निशाणा साधला आणि ते हुकूमशाहीबद्दल बोलत असल्याचे सांगितले. जेडीयूचे वरिष्ठ नेते श्याम रजक यांनी या चर्चेवर स्पष्ट वक्तव्य केले. संपूर्ण युती नितीश कुमार यांच्या पाठीशी आहे आणि निवडणुका त्यांच्या नेतृत्वाखाली लढल्या गेल्या आहेत. त्यांच्या मते, एनडीएमध्ये कोणतेही मतभेद नाहीत आणि नितीश कुमार मुख्यमंत्री राहतील. श्याम रजक यांच्या बोलण्याने जेडीयू त्यांच्या मागील निर्णयावर ठाम असल्याचे दिसत आहे.

एनडीएच्या विजयानंतर काही तासांतच, भाजपचे सरचिटणीस विनोद तावडे यांनी सांगितले की सर्व एनडीए पक्ष एकत्रितपणे मुख्यमंत्रिपदाचा निर्णय घेतील. ही एकच ओळ राजकीय वातावरण तापवण्यासाठी पुरेशी होती. जरी त्यांनी नंतर असेही जोडले की निवडणुका नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखाली लढल्या गेल्या, तरी त्यांच्या सुरुवातीच्या विधानामुळे संपूर्ण राज्यात गोंधळ निर्माण झाला. परिणामी, जेडीयू नेत्यांनी वारंवार स्पष्ट केले की नेतृत्व निवडणुकीदरम्यान होते तसेच राहील.

राजू सिंह यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, मुख्यमंत्र्यांची निवड कोणत्याही एका नेत्याच्या विधानांवर आधारित नाही, तर एनडीएच्या स्थापित प्रक्रियेवर आधारित आहे. त्यांच्या मते, विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत अंतिम निर्णय घेतला जातो आणि ही एनडीएची परंपरा राहिली आहे. त्यांनी स्पष्ट केले की हा पूर्णपणे वरिष्ठ नेतृत्वाचा विषय आहे आणि सर्व आघाडीतील भागीदार एकत्रितपणे निर्णय घेतील. राजू सिंह म्हणाले की, एनडीएला ऐतिहासिक बहुमत देण्यात जनतेने दाखवलेल्या विश्वासात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री नितीश कुमार दोघांनीही मोठी भूमिका बजावली. त्यांच्या मते, नितीश कुमार हे प्रचाराचा चेहरा आणि सरकारचा अनुभव असल्याने, मुख्यमंत्रीपदासाठी त्यांचे आघाडीचे दावेदार असणे स्वाभाविक होते.

# सिंदखेडराजा नगरपरिषद निवडणुकीला वेग मा. निवडणूक निरीक्षक सिंदखेडराजामध्ये दाखल, निवडणूक तयारीची पाहणी करून केले समाधान व्यक्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : महाराष्ट्र नगर परिषद सार्वत्रिक निवडणुक २०२५ च्या अनुषंगाने प्रशासनाची तयारी जोरदार सुरु असताना मा. श्री. जी. पी. साबळे यांची सध्या सुरु असलेल्या सिंदखेडराजा नगर परिषद २०२५ करिता निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्ती झाली असून त्यानिमित्ताने आज मा. निवडणूक निरीक्षक श्री. साबळे यांचे सिंदखेड राजा येथे आगमन झाले असून मा.निवडणुक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांनी मा. निवडणूक निरीक्षक श्री. साबळे यांचे स्वागत केले.

सध्या निवडणुकीचे उमेदवारांचे नाम निर्देशन अर्ज भरण्यासाठी उमेदवारांची आणि प्रशासनाची लगबग सुरु आहे, श्री. साबळे यांनी नामनिर्देशन अर्ज भरताना काही अडचणी येत आहेत का याची पाहणी केली सोबतच मतदान याद्या अद्यावत केलेल्या आहेत की नाही, तसेच निवडनूक अर्ज प्रक्रियेनंतरची



छाननी संदर्भात काही महत्वाच्या सूचना मा.निवडणूक निर्णय अधिकारी प्रा. संजय खडसे यांना दिल्या.

निवडणुकीच्या अनुषंगाने श्री. साबळे यांनी नगर परिषद सिंदखेडराजा येथील मतदान सुरक्षा कक्षाला (Strong Room) भेट देऊन तेथील सुरक्षा व्यवस्थेची पाहणी केली. सुरक्षेच्या दृष्टीने काही महत्वाच्या सूचना श्री. साबळे यांच्याकडून देण्यात आल्या. मतदान यंत्रे सुरक्षा कक्षाची पाहणी केली सोबतच उउढत च्या सुरक्षितेविषयी खातरजमा श्री. साबळे यांच्याकडून करण्यात आली.

निवडणुकीच्या अनुषंगाने फिरते पथक, स्थिर पथक यांची संख्या सद्यस्थितीमध्ये पुरेशी आहे, महत्वाच्या ठिकाणी चेक पोस्ट सक्रिय आहे इत्यादी विषयाचा आढावा घेण्यात आला. आज श्री. साबळे यांनी सिंदखेडराजा नगर परिषद हद्दीतील मतदान केंद्राला भेट देऊन तेथील पायाभूत सुविधांची पाहणी केली, दिव्यांग मतदाराला मतदान केंद्रावर येताना कसलीही अडचण येणार नाही याबद्दल विशेष सूचना त्यानी दिल्या. तसेच मतदान केंद्रावरील कायदा सुव्यवस्था, संवेदनशील मतदारसंघ याबद्दल आढावा घेतला, सर्व आढावा घेतल्यानंतर मा. निवडणूक निरीक्षक श्री. साबळे यांनी समाधान व्यक्त केले.

आजच्या आढावा दौऱ्यामध्ये निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे, मुख्याधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.आशिष बोबडे, नायब तहसीलदार डॉ. प्रवीणकुमार वराडे, नायब तहसीलदार नितीन बढे, प्रसार माध्यम नोडल अधिकारी प्रकाश शिंदे, हामीद काझी शहर अभियंता, ग्राम महसूल अधिकारी शिवानंद वाकदकर, राहुल देशमुख, उद्धव मांटे इत्यादी उपस्थित होते.

# ‘अमृत दुर्गोत्सव २०२५’ला गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचा बहुमान; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे प्रमाणपत्र केले सुपुर्द

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) संस्थेच्या कार्याची जागतिक स्तरावर दखल घेण्यात आली आहे. संस्थेच्या ‘अमृत दुर्गोत्सव २०२५’ या उपक्रमाने ‘मानवी हातांनी तयार केलेल्या प्रतिकृतींचा सर्वात मोठा डिजिटल फोटो अल्बम’ या श्रेणीत गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड नोंदविला आहे. या विक्रमाचे गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड प्रमाणपत्र देऊन अमृत संस्थेला सन्मानित करण्यात आले. या विक्रमाचे प्रमाणपत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे सुपुर्द करण्यात आले.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, अमृत संस्थेचे



व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी

**महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी संस्थेच्या कार्याची जागतिक स्तरावर दखल**

या यशाबद्दल ‘अमृत’ संस्थेचे अभिनंदन केले. महाराष्ट्राची दुर्गसंस्कृती ही आपल्या इतिहासाचे प्रतीक आहे. ‘अमृत दुर्गोत्सव’ या उपक्रमाद्वारे नव्या पिढीला या ऐतिहासिक वारशाशी जोडण्याचे उल्लेखनीय कार्य अमृत संस्थेने केले आहे, अशा शब्दात मुख्यमंत्र्यांनी कौतुक केले.

‘अमृत दुर्गोत्सव २०२५’ या उपक्रमाद्वारे युनेस्को मान्यताप्राप्त १२ ऐतिहासिक गड-दुर्गांच्या प्रतिकृतींसोबत सेल्फी काढून ते दुर्गोत्सवाच्या अधिकृत संकेतस्थळावर अपलोड करण्याचे आवाहन करण्यात आले होते. महाराष्ट्रासह देशातील विविध राज्ये आणि इतर देशातील नागरिकांनीही या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या उपक्रमात सहभागी झालेल्या प्रत्येक नागरिकाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वाक्षरीचे डिजिटल अभिनंदनपत्र देण्यात आले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या अध्यक्षपदी नंदकुमार देशपांडे तर उपाध्यक्षपदी प्रशांत माळवदे

## निवडीनंतर नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार; विविध विषयांवर झाले मंथन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : अखिल भारतीय ग्राहक पंचायतीची बैठक जिल्हाध्यक्ष शशिकांत हरीदास यांचे अध्यक्षतेखाली ज्येष्ठ मार्गदर्शक सुभाष सरदेशमुख, दीपक इरकल, प्रांत सहसंघटक विनोद भरते, प्रांत सदस्य जिल्हा उपाध्यक्ष विनय उपाध्ये जिल्हा सचिव सुहास निकते यांचे उपस्थितीत शहर तालुका अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर करण्यात येऊन अध्यक्षपदी नंदकुमार





देशपांडे. उपाध्यक्षपदी भाळवणी येथील पत्रकारिता क्षेत्रात ग्रामीण भागात कार्यरत असलेले प्रशांत माळवदे यांची निवड करण्यात आली. या मीटिंगच्या प्रारंभी ओझर येथे झालेल्या कार्यकर्ता शिबिराची माहिती शशिकांत हरीदास जिल्हाध्यक्ष व दीपक इरकल यांनी दिली यानंतर वरिष्ठांच्या मार्गदर्शना खाली पुढील प्रमाणे पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या आहेत.सचिव पदी महेश भोसले सहसचिव आझाद अल्लापुरकर कोषाध्यक्ष सागर शिंदे यांच्या पदाच्या निवडी घोषित केल्यानंतर कार्यकारणी सदस्य म्हणून धनंजय पंडी,संजय खंडेलवार, सतीश निपाणकर, मंगेश देशपांडे, शशिकांत सुगंधी, इंद्रजीत फडे, शाम तापडिया, शहाजी जाधव, शहाजी ठोंबरे आदींचा यामध्ये समावेश करण्यात आला. या निवडीनंतर नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार शशिकांत हरिदास , विनय उपाध्ये दीपक इरकल यांचे हस्ते करण्यात आला.

या बैठकीत सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त तालुकास्तरावर शहर स्तरावर विविध कार्यक्रमाचे आयोजन करणे नवीन सदस्य झाले. त्यांच्यासाठी ग्राहक पंचायत या विषयावर अभ्यास वर्ग आयोजित करणे, नवीन सभासद नोंदणी अधिक कार्यक्रम ठरवण्यात आले आले आहेत



## भगवान बिरसा मुंडा झाकी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धरती आबा भगवान बीरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त बाराभाटी येथे बिरसा मुंडा, राणी दुर्गावती, ग्यानसिंग नाईक, या महापुरुषांचे नागरिकांनी प्रतिरुप साकारुन झाकी तयार करण्यात आली. याचे वेशभूषा व रंगभूषाकार दादाजी मेश्राम यांनी केले आहे. या अलौकिक झाकाची रॅलीद्वारे गावात भव्य प्रदर्शन करण्यात आले.

# सावित्रीबाई फुले विद्यालयात येथे शिक्षक-विद्यार्थी पालक मेळावा संपन्न




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनीधी/सुधाकर रणदिवे : शहरातील सावित्रीबाई फुले विद्यालयात शिक्षक विद्यार्थी पालक मेळावा संपन्न झाला. सदरील पालक मेळावा इयत्ता ९ वी व १० वी वर्गाच्या विद्यार्थ्यांचा संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य. काकासाहेब मुंडे हे होते. कार्यक्रमासाठी उपप्राचार्य डॉ. मीनाक्षी शिंदे भवर, उपमुख्याध्यापक सोमनाथ सावंत, पर्यवेक्षक शंकर गोंदकर उपस्थित होते. कार्यक्रमासाठी पालक प्रतिनिधी म्हणून पत्रकार अमर चोंदे, रफिक रंगरेज, वैशाली पटेकर उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी त्यांना येणाऱ्या समस्या सांगितल्या त्यावर प्रशासन कोणत्या प्रकारे उपाययोजना करणार याबद्दल प्रशासनाने आपली भूमिका सांगितली. उच्च माध्यमिक विद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ मीनाक्षी शिंदे भवर, सहशिक्षक कमलाकर गिरी, प्रतिभा गांगुर्डे यांनी आपले विचार मांडले. त्याचबरोबर विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य काकासाहेब मुंडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक शंकर गोंदकर यांनी केले तर सूत्रसंचालन परमेश्वर मोरे यांनी केले तर आभार प्रदर्शन ज्ञानेश्वर तोडकर यांनी मानले यावेळी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# पंडित नेहरू यांचे स्वतंत्र चळवळीत मोलाचे कार्य... बालदिन साजरा : नेहरू जयंती मोठ्या उत्साहात पार पडली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोंदिया : भारत देशावर अनेक देशाचे राज्य होते. भारतावर खुप वर्षे राज्य करुन भारतातील अनेक महत्वाच्या घडामोडी घडविल्या गेल्या. अशावेळी भारताला स्वातंत्र्य मिळाले पाहिजे यासाठी अनेक तत्कालीन राज्यकर्ते यांनी प्रयत्न केले. त्यामध्ये पंडित जवाहरलाल नेहरू यांचे फारच मोलाचे कार्य आहे. स्वातंत्र्य चळवळ ही सर्व भारतीयांसाठी महत्त्वाची असल्याने ही कार्य अतिशय अलौकिक आहे. असे प्रतिपादन शाळेचे मुख्याध्यापक आर पी इठुले यांनी केले.

यावेळी मंचावर पी एल लांजेवार, प्रदीप ढवळे, आशिष शहारे, साधना पारधी, मन्नाभाई नंदागवळी, कार्तिक शहारे, दीक्षा तुरकर व तुषार महाजन आदी मान्यवर उपस्थित होते.



बालदिन साजरा करताना सदर शाळेतील मुलांचे पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. सर्व वर्ग प्रतिनिधी यांचेही बाल दिनानिमित्त सन्मानित करण्यात आले. तसेच मंचावरील मान्यवरांनी व विद्यार्थ्यांनी बालदिन व जवाहरलाल नेहरू यांच्या जीवनावर प्रकाश टाकला आहे.

कार्यक्रमाचे संचालन सुशांत वालदे यांनी केले तर आभार अंश राऊत यांनी मानले.

# पूरग्रस्तगावात प्रजनन आरोग्य सेवा देण्यासाठी प्रतिसाद टीम सज्ज




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील ४८ पूरग्रस्तगावांमध्ये (MISP) मिनिमम इनिशल सर्विस ऑफ पॅकेज अंतर्गत प्रजननक्षम जोडप्याना कुटुंब नियोजन साधणांचे वाटप, सुरक्षित गर्भपात, गरोदर व स्तनदा माता तपासणी, गर्भाशय व स्तानाची कॅन्सर तपासणी, एच.आय. व्ही तपासणी व समुपदेशन, लिंगभेद अन्याय व अत्याचार समुपदेशन व संदर्भ सेवा, वंधत्व निवारण, स्त्री पुरुष लैंगिक आजारावर उपचार, हिमोग्लोबिन, शुगर, व्ही.डी.आर.एल. तपासणी व सर्वसामान्य तपासणी व औषधोपचार आदी सेवा देण्यासाठी फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखेची आपत्कालीन वैद्यकीय प्रतिसाद टीम सज्ज झाली आहे.

इंटरनॅशनल प्लॅन्ड पेरेंटहूड फेडरेशन व ऑस्ट्रेलियन एड यांच्याकडून फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखेला स्प्रिंट फोर सी.इ. २०२५ महाराष्ट्र पूर आपत्कालीन प्रकल्प मंजूर करण्यात आला आहे. मुंबई मुख्यालयाचे प्रकल्प व्यवस्थापक डॉ. अमित कीटूकले यांनी आपत्कालीन वैद्यकीय प्रतिसाद टीम ला मिस्प सेवाविषयी या विषयी एकदिवसीय प्रशिक्षण दिले. या टीम मध्ये प्रकल्प समन्वयक, सांख्यिकी अधिकारी, समुपदेशक, एम.बी.बी.एस डॉक्टर, नर्स, लॅब टेक्निशियन व चार स्वयंसेवक असणार आहेत. महाराष्ट्र पूर आपत्कालीन प्रकल्प मुंबई मुख्यालयाच्या डायरेक्टर जनरल डॉ. कल्पना आपटे, असिस्टंट डायरेक्टर जनरल अमिता धानू, यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असणार आहे तर स्थानिक शासकीय आरोग्या यंत्रनेचे याला सहकार्य मिळणार आहे.

या प्रशिक्षण शिबिरात फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, वैद्यकीय अधिकारी डॉ. गौरी कहाते, डॉ. समन खान तांबोळी, डॉ. सोनाक्षी टेकाडे, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी, प्रकल्प समन्वयक स्वप्निल सोनवणे, सांख्यिकी अधिकारी मल्लिकार्जुन कडकोळ, समुपदेशिका रेखा पाटील-कपाळे, लॅब टेक्निशियन व्यंकटेश कंची, परिचारिका शकीला मणियार, अविनाश कांबळे, जिया शेख, सुनीता पाटील, कीर्ती धंगापुरे, लीला धंगापुरे, कल्पना गडगडे, आकाश गायकवाड, शाहीन मेंडूक, आशालता मस्के, रोजमेरी गायकवाड, सुकेशनी सोनकांबळे, हिशोब अधिकारी व्यंकटेश मच्छा आदी कर्मचारी उपस्थित होते.

# डॉ.नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन संचालित बौद्धिक अक्षम मुलांच्या विशेष शाळेत बालदिन उत्साहात साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पनवेल/केतन भोज : नवीन पनवेल येथील डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन संचालित बौद्धिक अक्षम मुलांच्या विशेष शाळेत पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त बालदिन उत्साहात साजरा करण्यात आला.विद्यार्थ्यांसाठी शाळेच्या परिसराची आकर्षक सजावट,रांगोळ्या आणि विविध उपक्रमांनी संपूर्ण वातावरण रंगतदार झाले होते.कार्यक्रमाची सुरुवात मुख्याध्यापिका सौ. श्रेया जाधव व विद्यार्थ्यांच्या हस्ते पंडित नेहरू यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाली.त्यानंतर विद्यार्थ्यांना दृकश्राव्य माध्यमातून पंडित नेहरू यांच्याविषयी माहिती दाखवण्यात आली.शिक्षकांनी बालदिनाचे महत्त्व समजावून सांगितले. पूर्व व्यावसायिक गटातील विद्यार्थ्यांनी भाषण केले, तर पूर्व प्राथमिक गटातील मुलांनी गीत सादर केले.थेरपी वर्गातील विद्यार्थ्याने 'चाचा नेहरू' ची वेशभूषा करून आकर्षण ठरला.बालदिनानिमित्त भारतीय जनता पार्टी पनवेल शहर उपाध्यक्ष केदार सुरेश भगत व त्यांचे सहकारी विद्यार्थ्यांसोबत बालदिन साजरा करण्यासाठी उपस्थित होते.विद्यार्थ्यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.

### केदार भगत यांच्याकडून मुलांना खेळणी व खाऊचे वाटप

श्री.भगत यांनी विद्यार्थ्यांना बालदिनाच्या शुभेच्छा देत शाळेसाठी पुढील काळात मदत करण्याचे आश्वासन दिले. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना खेळणी आणि खाऊ (पॉपकॉर्न व आईस्क्रीम) वाटप करण्यात आले.शेवटी मुख्याध्यापिका सौ.श्रेया जाधव यांनी मान्यवरांचे आभार मानले. संपूर्ण दिवस विद्यार्थ्यांसाठी आनंद,उत्साह आणि मौजमजेने भरलेला ठरला.बालदिनाचा उत्सव शाळेत संस्मरणीय पद्धतीने पार पडला.




## पालकांनी आहाराबाबत जागरूक राहणे अत्यावश्यक

# किशोरावस्थेच्या योग्य वाढीसाठी सकस आणि सात्विक आहारच उत्तम पर्याय : सत्यभामा कांबळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : किशोरावस्था ही आयुष्याच्या प्रवासातील अत्यंत महत्त्वाची पायरी आहे. या काळात शारीरिक, मानसिक आणि भावनिक असे तिन्ही स्तरांवर वेगाने बदल घडत असतात. शरीराची उंची वाढणे, स्नायू आणि हाडांची मजबुती, हार्मोन्सचे बदल, मेंदूची कार्यक्षमता आणि निर्णयक्षमता-या सर्वांवर योग्य आहाराचा थेट परिणाम होतो. त्यामुळे या वयोगटातील मुलांनी व पालकांनी आहाराबाबत जागरूक राहणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे किशोरावस्थेच्या योग्य वाढीसाठी सकस आणि सात्विक आहारच उत्तम पर्याय आहे असे प्रतिपादन कम्युनिटी मोबिलायझर सत्यभामा कांबळे यांनी केले.

त्या प्रिसिजन फाउंडेशन सोलापूर व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया




सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने उत्तर सोलापूर तालुका येथील नान्नज गावातील जी. बी. घोडके विद्यालयात तीन दिवसीय सर्वंकष लैंगिकता प्रशिक्षण शिबिरात प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या.

यावेळी व्यासपीठावर प्राचार्य रमेश अगलदीवठे, सुशांत घोडके, शुभांगी माने, सचिन कोरे, गिरीश देवकाते, मुकुंद भोसले, विकी शिवशरण, उर्मिला बनसोडे, संध्या वाघमारे आदी उपस्थित होते.

इयत्ता ७ वी ते १० पर्यंतच्या मुलांना विकी शिवशरण, उर्मिला बनसोडे व संध्या वाघमारे यांनी किशोरावस्था वाढीचे टप्पे, किशोरावस्था व आहार, वैयक्तिक व परिसर स्वच्छता, मासिकपाळी स्वच्छता, शारीरिक सौरचना, चांगला व वाईट स्पर्श, एच.आय.व्ही/एड्स, कॅन्सर, सायबर गुन्हे, पोक्सो ॲक्ट, शारीरिक सौरचना आदी विषयावर जागृत केले. शेवटच्या दिवशी सर्व मुलांची हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली व गरजू मुलींना रक्त वाढीसाठी औषधे देण्यात आली.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक विकी शिवशरण यांनी केले सूत्रसंचालन उर्मिला बनसोडे यांनी केले तर आभार संध्या वाघमारे यांनी मानले.

